नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 05/04/2021 (सोमवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 12 कि. मी. मौजा बडेगाव खर्डुका रोडवर अमोल बुर्डे यांच्या शेताजवळ येथे दिनांक 11/03/2021 चे 12:30 वा. दरम्यान फिर्यादीचे जवाई आरोपी/मृतक नामे– दिनेश गणेश विस्के वय 42 वर्षे रा. खर्डुका हा आपले एमएच–40/बीवाय– 3548 क्रमांकाच्या मोटरसायकलने बडेगाव येथुन खर्डुकाकडे परत जात होता. त्यादरम्यान त्याची मोटरसायकल रोडवर स्लीप झाल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रकाश रामाजी हरदे, वय 34 वर्षे, रा. खर्डुका यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री झांबरे मो नं 9028748409 हे करीत आहे.

## दुखापत

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर पंकज किराणा चे मागे ईतवारी पेठ उमरेड येथे दिनांक 04/04/2021 चे 13.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– निलेश शंकर वारजुरकर वय 30 वर्ष रा. ईतवारी पेठ उमरेड यांच्या घरासमोर मोकाट गाय आली असता तिला बाहेर हाकलण्यासाठी फिर्यादीने हातात लाकडी काठी घेतली आणि गाय जास्त मस्तावली असे म्हटले असता आरोपी क्र. 1) प्रकाश वारजुरकर वय 52 वर्ष व 2) चेतन वारजुरकर वय 27 दोन्ही रा. ईतपारी पेठ उमरेड हे घराबाहेर आले व फिर्यादीला म्हणाले की, तु कोणाला म्हणतोस असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ केली व झगडा भंडण केले. तसेच आरोपी क्र. 01 ने लाकडी पाठ हातात घेतला व फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवा श्री. आशिष खोडे 8411052628 हे करीत आहे.

2) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 14 कि.मी अंतरावर मौजा चिचाळ येथे दिनांक 03/04/2021 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. जयश्री सुरेश पंचबुधे, वय 32 वर्ष, रा. चिचाळ ता कुही व आरोपी नामे– सुरेश डोमाजी पंचबुधे, वय 40 वर्ष दोन्ही रा. चिचाळ कुही हे पती पत्नी असून फिर्यादी ही स्वयंपाक करीत असता आरोपीने जेवन घेतले व ''भाजीमध्ये हळद जास्त का टाकली'' या कारणावरून फिर्यादीला शिवीगाळ करून फिर्यादी ही पोळया करीत असता आरोपीने तिचा हातातील बेलना हिसकावून त्या लाकडी बेलन्याने फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीला ''तु वनीला जाते ते पैसे मला दे नाही तर तुला जिवाने मारून टाकणार'' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवा श्री. पोहवा संजय पायक मोक्र. 8830923310 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर